


One Day Interdisciplinary

State Level Seminar On

# MAHATMA GANDHI AND HUMAN RIGHTS

**Monday, 10/12/2018**




Organised By
**Department of Political Science**
**&**
**Department of Economics**

Published By
SAI JYOTI PRAKASHAN, NAGPUR


LOK SHIKSHAN PRASARAK MANDAL'S
**LOK MAHAVIDYALAYA**
**WARDHA (M.S.)**
NAAC Reaccredited 'B' Grade

prinicpal@lokmv.edu.in
www.lokmv.edu.in

# अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | आंतरराष्ट्रीय मानव अधिकार दिवस व महात्मा गांधी | – | अ. दे. हेमके | 1 |
| २. | महात्मा गांधीचा मानवाधिकारासाठी संघर्ष | – | डॉ. सौ. पुष्पा तायडे | 5 |
| ३. | मानवतेचे पुजारी महात्मा गांधी | – | प्रा. सुनिल दा. पाटणे | 9 |
| ४. | महात्मा गांधीजींच्या दृष्टीकोनातून मानवाधिकार | – | डॉ. अनिल सुरकार | 12 |
| ५. | महात्मा गांधींच्या परिप्रेक्षातून मानवाधिकार | – | डॉ. विजय बोबडे | 17 |
| ६. | महात्मा गांधी व मानवाधिकार | – | डॉ. वर्षा गंगणे | 20 |
| ७. | मानवाधिकार एक मानवतावादी समस्या – महात्मा गांधी | – | डॉ. सौ. मंजुषा ठाकरे | 23 |
| ८. | दिव्यांग व्यक्तींचे मानवी हक्क | – | डॉ. संदीप भि. काळे | 26 |
| ९. | महात्मा गांधी व मानवाधिकार | – | डॉ. प्रदिप वि. ताकतोडे | 29 |
| १०. | मानवी हक्कासाठी महात्मा गांधीजींचा लढा: एक दृष्टीक्षेप | – | डॉ. सुनिल शिंदे | 30 |
| ११. | महात्मा गांधी आणि भारतीय स्त्रीचे मानवाधिकार | – | डॉ. राजु भा. खरडे | 34 |
| १२. | महात्मा गांधी व मानवी अधिकार: एक विचार | – | डॉ. रविंद्र म. बेले | 37 |
| १३. | महात्मा गांधी व मानवाधिकाराचे स्वरुप व वैशिष्ट्ये | – | डॉ. मोहन पाठक | 39 |
| १४. | गांधी विचार व मानवाधिकार: सहसंबंध | – | डॉ. पल्लवी सा. काळे | 41 |
| १५. | महात्मा गांधी व मानवाधिकार | – | डॉ. प्रकाश बा. तितरे | 44 |
| १६. | महात्मा गांधी व मानवाधिकार | – | डॉ. संजय अवधुत | 47 |
| १७. | महात्मा गांधी व मानवाधिकार– एक चिकीत्सा | – | प्रा. दिपक आय. अवथरे | 49 |
| १८. | महात्मा गांधी आणि अस्पृश्योद्धार | – | प्रा. सौ. सुनिता प्रदिप रंगारी | 52 |
| १९. | मर्यादा विरहीत मानवाधिकार आणि महात्मा गांधी | – | प्रा. आर. जी. अंबाडकर | 55 |
| २०. | महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान व मानवाधिकार | – | डॉ. आस्तीक मुंगमोडे | 56 |
| २१. | महात्मा गांधी व मानवाधिकार – एक समिक्षा | – | प्रा. राजेंद्र एस. खंडारे | 59 |
| २२. | महिला सक्षमीकरण व महात्मा गांधीजींचे विचार | – | डॉ. विठ्ठल घिनमिने | 61 |
| २३. | महात्मा गांधी व मानवाधिकार | – | प्रा. नरहरी एस. राऊत | 64 |
| २४. | महात्मा गांधींची मानवतावादाची संकल्पना | – | डॉ. राजेंद्रप्रसाद पटले व प्रा. के. एस. फुलझेले | 66 |
| २५. | महात्मा गांधी व मानवाधिकार | – | डॉ. डी. एन. प्रसाद | 69 |
| २६. | महात्मा गांधी और मानवाधिकार | – | डॉ. राष्ट्रपाल गणविर | 73 |
| २७. | महात्मा गांधी और मानवाधिकार | – | प्रा. रमेश टि. बागडे और डॉ. रवी आर. पाठेकर | 76 |
| २८. | मानवाधिकार और गांधीजी के समानता के विचार | – | गणेश ताराचंद खैरे | 79 |
| २९. | भारत मे मानवाधिकार | – | डॉ. ममता रुपचंद कुंभलवार | 82 |
| ३०. | India & Human Rights: Other Side | - | Dr. Pravin Bhagdikar | 85 |
| ३१. | Mahatma Gandhi & Human Rights | - | D. S. Shambharkar | 90 |
| ३२. | Mahatma Gandhi & Human Rights | - | Dipak R. Shinde | 93 |
| ३३. | Mahatma Gandhiji's Aspects of Human Rights | - | Dr. Jyoti M. Pande | 96 |
| ३४. | Human Rights: Gandhi's Framework | - | Dr. Vibhavari B. Hate | 98 |
| ३५. | Mahatma Gandhi & Social Think | - | Prabhakar Motghate Dr. Gopal Zade | 100 |

ISBN:978-93-88708-08-1

# मानवी हक्कासाठी महात्मा गांधीजींचा लढा : एक दृष्टीक्षेप

डॉ. सुनिल शिंदे
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

मानवी हक्काच्या जगभरात होणाऱ्या पायमल्लीबाबत महात्मा गांधी यांनी अनेक राष्ट्रामध्ये आंदोलने आणि लढे उभारलेले आहेत. मानवाला जन्मताच जे हक्क आणि अधिकार मिळालेले आहेत त्या अधिकारावर कुठलीही गदा न येता आणि राज्य आणि शासनाने कायद्यानी मानवाला जे अधिकार प्रदान केलेले आहे. ते मिळालेच पाहिजे अशी महात्मा गांधीची धारणा होती. मानवी हक्काकडे पाहण्याचा महात्मा गांधीचा दृष्टीकोन नैतिकतेवर आधारित होता. ती त्यांच्या वैचारिक दृष्टीकोनातून वारंवार प्रगट झालेली आहे. अमेरिकन खासदार कॅरोलीन मेलोनी याच्या मते जगभरात शांततामय मार्गाने मानवी हक्कविषयक चळवळ सुरू करण्याची प्रेरणा महात्मा गांधीमुळेच मिळाली. महात्मा गांधींनी अहिंसात्मक मार्गाने सत्याग्रह चळवळ सुरू केली. यातून देशाला आणि जगालाही सत्याग्रहाची प्रेरणा मिळाली. सार्वजनिक क्षेत्रात काम करतांना आपल्यालाही महात्मा गांधींपासून प्रेरणा मिळाली असून त्यांच्या सिध्दांतानुसार आपण चाललो तर जगामध्ये बदल घडतांना पाहू शकू असेही मेलोनी यांनी सांगितले.

* मानवी हक्काचा अर्थ

मानवी हक्काचा अर्थ वेगवेळ्या लोकांसाठी वेगवेगळा असू शकतो. ते कालानुरूप बदलत जातात. म्हणून त्यांच्या व्याख्या स्थिर नाहीत. परंतु मानवी कल्याणाच्या दृष्टीकोनातून त्याचे अन्यनसाधारण महत्व आहे.

"लोकांना त्यांचे मानवी हक्क नाकारणे म्हणजे त्यांच्या माणूसकीलाच आव्हान देणे आहे"–नेल्सन मंडेला

"स्वातंत्र असण्याचे काहीच महत्व नाही. जर त्यात चुक करण्याचे स्वातंत्र समाविष्ठ नसेल. खुप अनुभवी आणि सक्षम मानव देखिल इतर मानवांना त्यांच्या मुलभूत अधिकारापासून दुर कसें ठेऊ शकतात, हे मला उमगलेले नाही"– महात्मा गांधी

मानवी हक्काचा अर्थ सर्वप्रथम इंग्लंडमध्ये मॅग्नाकार्टामध्ये सांगितला गेला. (१२१५) याच्या माध्यमातून ब्रिटीश नागरिकांना काही नागरी हक्क देण्यात आले. मॅग्नाकार्टाने मानवी हक्काचा पाया रचला. इग्लंडमध्ये बिल ऑफ राइट (१६८९) मध्ये प्रचलित कायद्याची नोंदनी करून मानवी हक्क व स्वातंत्र याची नोंद केली गेली. अमेरिकी स्वातंत्र्याचा जाहीरनामा (१७७६) यात सर्व व्यक्ती समान असून त्यांना अधिकार मिळाले पाहिजेत असे घोषित करण्यात आले. फ्रेंच राज्यक्रांती(१७८९) यामध्ये स्वातंत्र समता व बंधुता याची घोषणा झाली. यात मानवी अधिकार सर्वांना मिळावेत याची चर्चा झाली.

परंतु मानवी हक्काचे महत्व दुसऱ्या महायुद्धानंतर वाढलेले दिसते. सयुंक्त राष्ट्रानेही मानवी अधिकाराची सनद तयार करून ती १० डिसेंबर १९४८ रोजी मान्य केली. म्हणून हा दिवस दरवर्षी 'मानवी हक्कदिन' म्हणून साजरा केला जातो.

* मानवी हक्काचे स्वरूप मानवी हक्क म्हणजे जे माणसाला माणूस म्हणून मिळतात. प्रत्येक मानवामध्ये काही गुण असतात. त्या गुणांचा पूर्ण विकास होण्यासाठी प्रत्येकाला समान संधीची आवश्यकता असते. जेव्हा सर्वांना समान संधी दिली जाते. तेव्हा प्रत्येक व्यक्ती आपल्यातील सुप्त गुणांचा विकास करू शकतो. यावरून मानवी हक्क हे सार्वत्रिक आहेत.

 ISBN:978-93-88708-08-1

मानवी हक्काची संकल्पना काळानुसार बदललेली असते. आज आपण केवळ नागरी किंवा राजकीय अधिकारांचाच विचार करत नाही तर माहितीचा अधिकार अथवा प्रदुषणमुक्त पर्यावरणाचा अधिकार यासारख्या अधिकारांची चर्चा करतो. म्हणजेच मानवी हक्क काळानुसार विकसित होणारे असतात. हे अधिकार आपल्याला जन्मजात मिळतात ते आपल्या पासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. ते आपल्याला समाजाने अथवा राज्यकर्त्यांने दिलेले नसतात.म्हणजेच मानवी हक्क आपल्यापासून विलग्न करता येत नाही.

प्रत्येक हक्कासोबत आलेले कर्तव्य व्यक्ती व राज्य यांच्यासाठी बंधकारक असते. उदा. आपणास प्रदुषणमुक्त पर्यावरणाचा अधिकार मिळतो. तेव्हा पर्यावरणातील प्रदुषण टाळणे किंवा जास्त झाडे लावणे यासारखी कर्तव्ये आपल्याला पार पाडावी लागतात. प्रदुषणास कारणीभूत ठरणाऱ्यांवर कारवाई करणे हे मग राज्याचेही कर्तव्ये ठरते. म्हणजे हक्क व कर्तव्य एकमेकांपासून विलग्न करता येत नाहीत. त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

हक्क हे राज्य व शासन यांनी मान्य केलेले असतात. हे हक्क राज्यघटनेत मुलभूत हक्काच्या स्वरूपात समाविष्ट केले जातात. म्हणजेच हक्कांना कायद्याची मान्यता असते.

आपण हक्क उपभोगात असलो तरी या हक्कांना राज्याने घालून दिलेली काही बंधने असतात. जसे आपल्याला विचार करण्याचे व बोलण्याचे स्वातंत्र आहे. पण हे स्वातंत्र आपण कोणाला बदनाम करण्यासाठी अथवा कोणावर खोटे आरोप करण्यासाठी वापरू शकत नाही. राज्यघटनेत आपल्या हक्कासोबत त्यावरची बंधने नमुद कलेली असतात. म्हणजेच हक्क हे अनिर्बंध नसून त्यावर वाजवी बंधने घातलेली असतात.

* मानवी हक्कासाठी गांधीजींचा लढा

मोहनदास करमसंद गांधी अर्थात महात्मा गांधी यांचा जन्म २ ऑक्टोंबर १८६९ मध्ये गुजरात राज्यातील पोरबंदर येथे झाला. पोरबंदर येथेच त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. मुंबई येथे उच्च शिक्षण घेऊन ते बॅरिष्टरची पदवी घेण्यासाठी इंग्लंडला गेले. त्यांनी मुंबईत काही काळ वकीली सुरू केली. याच ठिकाणी त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्यांची सुरवात झाली. आफ्रिकेत असतांनाच जॉन रस्कीनने लिहिलेल्या 'अन टू धिस लास्ट' या पुस्तकाच्या वाचनानंतर महात्मा गांधीजीमध्ये आमुलाग्र परिवर्तन घडून आले. स्वातंत्र व समता यासाठी लढा देणारा नेता म्हणून आफ्रिकेत त्यांना मान्यता मिळाली. दक्षिण आफ्रिकेत त्यांनी १९०६ ते १९१४ या काळात मानवी हक्कासाठी सत्याग्रह चळवळीचे कार्य केले.

दक्षिण आफ्रिकेत त्यावेळी तीव्र स्वरूपाचा वर्णद्वेष इतक्या खालच्या स्तराला पोहचला होता. की महात्मा गांधीजींना रेल्वेच्या प्रथम श्रेणीच्या डब्यातून गोऱ्यांनी बाहेर काढले. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना मानवी हक्काचा न्याय मिळवुन देण्यासाठी गांधीजींनी इ.स. १९०६ साली 'सत्याग्रह' या नव्या हत्याराचा अवलंब केला. ही चळवळ पूर्णत: शांततेने व अहिंसात्मक असल्यामुळे शासनाला दडपशाहीचा अवलंब करता आला नाही. या नि:शस्त्र व संघटीत शक्तीपुढे सरकारला झुकावे लागले. मानवी हक्कासाठी 'सत्याग्रह' या नव्या अहिंसात्मक अस्त्राच्या शक्तिची सर्व जगाला जाणीव झाली.

इ.स. १९९५ ला म. गांधीजी आफ्रिकेतून भारतात आले. गांधीजांच्या प्रारंभीच्या जीवन काळात मानवी हक्कासाठी चंपारण्या सत्याग्रह, खेडा सत्याग्रह व अहमदाबाद येथिल आंदोलनाचा सहभाग होता. ह्या कार्यामुळे गांधीजांचे नाव सर्वतोमूखी झाले. ब्रिटीश सरकारने जेव्हा भारतीय राष्ट्रीय चळवळ दडपण्यासाठी रौलेट कायदा लागू केला. तेव्हा मानवी हक्कासाठी गांधीजीच्या सुचनेनुसार भारतीयांनी देशभर उपोषण, हरताळ, सार्वजनिक सभा हे निषेध अस्त्र वापरले. गांधीजींना अटक झाली तेव्हा ठिकठिकाणी हिंसक आंदोलने सुध्दा झाली.

ISBN:978-93-88708-08-1

१२ एप्रिल १९१९ ला पंजाबमधील अमृसर शहरात कायदा व सुव्यवस्था स्थापन करण्यासाठी लष्करी कायदा पुकारून, लष्कर प्रमुख जनरल डायर यांच्या हाती शहर सोपविण्यात आले. त्याने बंदी हुकूम जारी केला. जालियनवाला बागेत नि:शस्त्र जनतेवर जनरल डायरने बेछूट गोळीबार केला. त्यात अनेक जखमी व मृत पायले. मानवी हक्काचा विचार करून गांधीजींनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला.

जेव्हा भारतात मुस्लिम बंधूंनी खिलाफत चळवळ केली तेव्हा महात्मा गाधींनी मानवी हक्काच्या सरंक्षनार्थ या चळवळीला कांग्रेसचा पाठिंबा मिळवून चळवळीचे नेतृत्वही केले. ऑगष्ट १९२० पासून महात्मा गाधींनी मानवी हक्कासाठी देशव्यापी हरताळ पुकारून ब्रिटीशांविरूध्द असहकार चळवळ सुरू केली. खिलाफत चळवळीने महात्मा गांधींच्या असहकार चळवळीला पाठिंबा दिला.

महात्मा गाधीजींनी जेव्हा मानवी हक्कासाठी अहिंसक असहकार चळवळ सुरू केली त्यावेळी देशात अत्यंत स्फोटक परिस्थिती होती. खिलाफतीच्या प्रकरणावरून मुस्लिमात असंतोष निर्माण झाला होता. रौलेट कायदा, जालीयनवाला बाग हत्याकांड, सरकारची दडपशाही, १९१९ च्या सुधारणा कायद्यातील असमाधानकारक तरतुदी यामुळे भारतीयांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. २६ डिसेंबर १९२० ला नागपूर अधिवेशनात असहकार चळवळीला कांग्रेसने मान्यता दिली. या चळवळीच्या ठरावानुसार खालील निर्णय घेण्यात आले.

१. अधिकारपदे, पदव्या, मानाच्या जागांचा त्याग करावा.
२. सरकारी सभा, कार्यक्रमांना नागरिकांनी हजर राहू नये.
३. सरकारी शाळांच्या ऐवजी राष्ट्रीय शिक्षण संस्थात विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.
४. सरकारी न्यायालयावर बहिष्कार टाकावा, देशी न्याय पंचायतीमध्ये जावे.
५. कायदेमंडळाच्या निवडणुकीवर बहिष्कार घालावा.
६. परदेशी मालावर बहिष्कार घालावा व स्वदेशीचा पुरस्कार करावा.

वरील निर्णयापैकी बऱ्याच तरतुदी अमलात आणल्या गेल्या परंतु चौरीचौरा प्रकरणात २१ पोलीस व १ सबइन्स्पेक्टर अशा बावीस जणांचा मृत्यू झाला. या हिंसाचारामुळे मानवी हक्क पायदळी घातले गेले म्हणून म. गांधीजींनी असहकार आंदोलन तातडीने बंद केले.

दक्षिण आफ्रिकेतून गांधीजी भारतात आल्याबरोबर त्यांनी देशातील एकंदर परिस्थितीचे अवलोकन केले. भारतातील अती व दैन्य दारीद्र्य पाहून त्यांचे मन विषण्य झाले. त्यातुनच त्यांनी नागरिकांच्या मानवी हक्कासाठी आपल्या जीवन शैलीत बदल केला. २५ मे १९१५ रोजी त्यांनी साबरमती नदीच्या किनाऱ्यावर सत्याग्रहाश्रम स्थापन केला. नंतर साबरमतीहून ते १९३६ च्या सुमारास सेवाग्राम (वर्धा) येथे आले. १९२० चे असहकार आंदोलन मानवी हक्क मिळविण्यासाठी १९४२ चे छोडो भारत आंदोलन इत्यादी घटनांमध्ये मानवी हक्कासाठी लढा देण्याचे महात्मा गांधींची प्रेरणा, शक्ती व नेतृत्व होते. त्यामुळेच इ.स. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र मिळाले.त्यांच्या बद्दल वाटणारा आदर, निष्ठा व अपार श्रध्दा यामुळे लोकांत त्यांना महात्मा म्हणून मान्यता मिळाली. स्वतंत्र भारतात 'राष्ट्रपीता म्हणून त्यांचे स्थान संस्मरणीय आहे. मानवी हकसाठी सत्य अहिंसा या शाश्वत मूल्यांचा वारसा त्यांनी जगाला दिला. त्यामुळे 'जागतिक शांततेचे महानदूत' म्हणून त्यांचा गौरव केला जातो.

**⁂ उपसंहार**

महात्मा गांधीजीचे कर्तुत्व आणि नेतृत्व श्रेष्ठ दर्जाचे होते. संपूर्ण भारत एकसंघ ठेवण्यासाठी गांधीजीनी आपल्या प्राणाची आहुती दिली. ते संपूर्ण लोकांना मानवतेच्या भूमिकेतून पाहात होते. त्यांनी स्पृश अस्पृश असा भेदभाव न पाळता दिन–

ISBN:978-93-88708-08-1

दलित, गोरगरीब लोकांच्या उन्नतीसाठी सतत संघर्ष महात्मा गांधीजींच्या विचार, आचार व तत्त्वांचे केवळ स्मरण न करता त्यांनी ज्या तत्वासाठी संघर्ष केला ती पारदर्शी वृत्तीने स्विकारल्यास आपण केवळ स्वावलंबी न राहता जगातील इतर देशांनाही उपयुक्त असे कार्य करू शकतो. महात्मा गांधीच्या मार्गावर चालायचे असेल तर त्यांनी ज्या मुल्यासाठी बलिदान दिले ते आचरणात आणण्याचे धैर्य आपल्यात असले पाहिजे. चांगल्या वागणूकीतून ताकद मिळते, स्वार्थीपणातून नाही. हिंसेतून हिंसाच जन्म घेते व ही न संपणारी प्रक्रिया असते. मानवी संस्कृतीच्या इतिहासामध्ये विसावे शतक सर्वाधिक रक्तरंजित ठरले असले तरी याच काळात अहिंसेचे महत्त्वही अधोरेखित झाले. आजही जगभरातील विविध व्यक्ती व संघटना हल्ला व हिंसाचाराचा मुकाबला करण्यासाठी अहिंसेच्या मार्गाने जात आहेत. त्यामुळे आशेचा किरण कायमच तेवत राहिला आहे. जगातील एकाही भाषेत 'अहिंसेला' पुरक शब्द नाही. हेच या तत्त्वाचे मोठे यश आहे.आपण गांधीजीच्या जीवनाने केवळ प्रेरित न होता त्यांच्या मार्गावरून चालून मिळणाऱ्या सुखमय जीवनाचा उपभोग घेतला पाहिजे. महात्मा गांधीजी म्हणत हिंसेतून कोणतेच प्रश्न सुटत नाही. उलट ते चिघळत जातात. म्हणून आपण अहिंसेचा मार्गानी चाललो पाहिजे. त्याचे विचार केवळ भारतालाच प्रेरक नव्हते तर ते संपूर्ण जगाला दिशा दाखविणारे होते. असे सांगीतले.

संदर्भग्रंथ

१. डॉ. रामजी सिंह – गांधी दर्पन मीमांसा
२. डॉ. सोमनाथ रोडे, आधुनिक भारत – (१८१९–१९७५)
३. डॉ. सौ. अनुराधा अ. गद्रे – महात्मा गांधी
४. डॉ. सुमन वैद्य – आधुनिक भारत
५. प्रकाष नारायन नाटानी – गांधी दर्पन मीमांसा
६. प्रा.बी.वाय.कुलकर्णी/ प्रा. अशोक भा. नाईकवाडे.– भारतीय राजकीय विचारवंत